# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

## ना. चंद्रकांत पाटील

# मुलींसाठीच्या कमवा व शिका या योजनेला बळ देणार

▲पाटण, दि. ९ : पंतप्रधान मोदीजींनी नवीन शैक्षणिक धोरण अवलंबले असून त्याचा चांगला फायदा मुलांच्या शिक्षणासाठी होत आहे. जगात पैसा ही श्रीमंती नाही तर ज्ञान हीच संपत्ती आहे. राजकारण तर होईलच पण शिक्षणाकडे प्रथमतः लक्ष दिले पाहिजे. विशेष करून मुलींच्या शिक्षणाकडे लक्ष दिले पाहिजे. मुलींसाठीच्या कमवा व शिका या योजनेला बळ देणार आहे. पाच लाख मुलींना दरमहा दोन हजार रुपये पॉकेटमनी म्हणून मिळाले पाहिजेत यासाठी आपण प्रयत्न करणार आहोत. समाजाच्या सर्व क्षेत्रात महिला छाप पाडतील यासाठी मुली, महिला शैक्षणिक व आर्थिकदृष्ट्या मजबूत झाल्या पाहिजेत. डोंगरदऱ्यातून येणाऱ्या मुलींची राहण्याची गैरसोय होवू नये यासाठी मुलींच्या वसतिगृहासाठी आपण प्राधान्य देवू. उषा योजनेतही कोयना एज्युकेशन सोसायटीचा नक्कीच विचार केला जाईल, असे आश्वासन राज्याचे उच्च तंत्रज्ञान व शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले.



मार्गदर्शन करताना ना. चंद्रकांतदादा पाटील, व्यासपीठावर आ. डॉ. अतुल भोसले, अमित कुलकर्णी, सत्यजितसिंह पाटणकर, अमरसिंह पाटणकर, सुहास देशमुख, संजीव चव्हाण, याज्ञसेन पाटणकर, डॉ. शिरीष पवार. (सुरेश संकपाळ)

येथील कोयना एज्युकेशन सोसायटीच्या बी. डी. कॉलेज पाटण येथे विविध नवीन अभ्यासक्रमांचा शुभारंभ, नवीन अद्ययावत संगणक प्रयोगशाळा आणि विस्तारित इमारतीच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष आ. डॉ. अतुल भोसले, शिवाजी विद्यापीठाचे माजी संचालक अमित कुलकर्णी, भाजपचे राज्य सदस्य व सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक सत्यजितसिंह पाटणकर, कोयना एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर, जॉइंट सेक्रेटरी सुहास देशमुख, संचालक याज्ञसेन पाटणकर व संजीव चव्हाण, माजी सभापती राजभाऊ शेलार, भाजपचे ज्येष्ठ नेते हिंदुराव पाटील, अभिजित पाटील, विक्रमसिंह पाटणकर दूध संघाचे चेअरमन सुभाषराव पवार, श्रीराम नागरी बँकेचे चेअरमन हिंदुराव सुतार, खरेदी-विक्री संघाचे चेअरमन ॲड. अविनाश जानुगडे, पाटण अर्बन बँकेचे चेअरमन बाळासाहेब राजेमहाडिक, नगराध्यक्षा सौ. अनिता देवकांत, उपनगराध्यक्ष सचिन कुंभार, दिनकर घाडगे, माजी सभापती पूजा कदम, भाजपचे रवींद्र पाटील, सचिन जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

ना. चंद्रकांत पाटील म्हणाले, केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी व राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देशात व राज्यात शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी तसेच डिजिटल क्षेत्रात देश अग्रगण्य बनवण्यासाठी विशेष भर दिला आहे, म्हणूनच आज राज्यातील लाखो विद्यार्थ्यांना परदेशात मागणी आहे. पाटणसारख्या दुर्गम भागात कोयना एज्युकेशन संस्थेने शिक्षणाची वेगवेगळी दालने खुली करून विद्यार्थ्यांची शिक्षणाची चांगली सोय केली आहे. संस्थेला आपण सीईटी परीक्षा केंद्र मंजूर करून देवू. तसेच यापुढेही संस्थेला जी काही मदत लागेल ती आपण करू, असे आश्वासन त्यांनी दिले.

आ. डॉ. अतुल भोसले म्हणाले, कोयना एज्युकेशन सोसायटी विविध शाखांच्या माध्यमातून दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना नवनवीन शैक्षणिक ज्ञान कसे मिळेल यासाठी प्रयत्न करत आहे ही कौतुकास्पद बाब आहे. माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर यांनी तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केले. त्यांच्याच पावलावर पाऊल टाकत अमरसिंह पाटणकर, सत्यजितसिंह पाटणकर व याज्ञसेन पाटणकर हे काम करत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सत्यजितसिंह पाटणकर यांच्यावर लक्ष आहे. आगामी काळात येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत भाजपची सत्ता येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सत्यजितसिंह पाटणकर म्हणाले, कोयना एज्युकेशन सोसायटीचा ३० वर्षांचा पत्र्याच्या शेडमधून ते आतापर्यंतचा अद्ययावत इमारतीपर्यंतचा प्रवास सर्वांनी पाहिला आहे. आज संस्थेच्या २७ शाखांच्या इमारती अत्याधुनिक झाल्या आहेत. १९६७ साली संस्थेची स्थापना झाली तेव्हा स्व. के. व्ही. पाटील, स्व. दादासाहेब पवार, स्व. भागवतराव देसाई, स्व. श्रीमंत उदयसिंह पाटणकर, स्व. युसूफभाई शेख, स्व. श्रीपतराव मोळावडे, स्व. अनंतराव देसाई यांच्या खांद्याला खांदा लावून डॉ. सोपानराव चव्हाण, अमरसिंह पाटणकर यांनी काम केले. १९८३ पूर्वी अनेक वाड्यावस्त्यांवर वीज, पाणी, शाळा, रस्ते, आरोग्य आदी मुलभूत गरजा नव्हत्या. विक्रमसिंह पाटणकर आमदार झाल्यानंतर प्रत्येक वाडीवस्तीवर सुविधा मिळाल्या.

प्रास्ताविकात संचालक संजीव चव्हाण यांनी कोयना एज्युकेशन सोसायटीच्या निर्मितीपासून आजपर्यंतच्या प्रवासाबाबत माहिती दिली. संचालक याज्ञसेन पाटणकर यांनी स्वागत केले. प्राचार्य डॉ. शिरीष पवार यांनी आभार मानले. कार्यक्रमास तालुक्यातील विविध क्षेत्रातील मान्यवर, शिक्षणप्रेमी, विद्यार्थी, पालक मोठ्यासंख्येने उपस्थित होते.